जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१३/०६/२०२४
## दि.१२/०६/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९५९/२०२४,भादविक ३०७,३२४,३२३,५०४,५०६,४२७,३४ सह क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३,७ सह महा.पोलीस अधिनियम कलम ३७ (१),१३५ |
| **फिर्यादी** | राजेशकुमार सिंग वय ३५ वर्षे,रा.मांजरी बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०६/२०२४ रोजी रात्री १९/३० वा.चे.सुमारास रविराज पान शॉप ॲण्ड जनरल स्टोअर्स नावाची पान टपरी साडेसतरा नळी चौक,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे दुकानामध्ये बसलेले असताना पुर्वी त्यांचे परिसरात राहणारे यातील नमुद चार इसमांनी फिर्यादी यांचेकडे स्टींग कोल्ड्रींगचे एकुण ४० बॉटल्स् मागीतल्या असता फिर्यादी यांनी त्यास नकार दिल्याचा राग मनात धरुन जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचे कडील लोखंडी हत्याराने डोक्यावर,मानेवर वार करुन दुखापत केली.तसेच फिर्यादी यांचे भावाच्या दुकानातील चहा बनविण्याची मशिन व इतर सामान फोडून नुकसान केले.त्यानंतर सदर ठिकाणी त्यांचे हातातील लोखंडी हत्यारे हवेत फिरवून फिर्यादी यांचे शेजारी असणा-या इतर दुकानामध्ये जावून त्यांचे दुकानातील सामानाचे नुकसान करुन नमुद परिसरात दहशत निर्माण केली.व जमलेल्या लोकांना शिवीगाळ करुन तेथून पळून गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.हसन मुलाणी,मो.नं.९२२६९९८९३० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४७९/२०२४,भादविक २७९,३०४(अ) मो.वा.का.कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६७ वर्षे, रा.मु/पो आळंदे ता.भोर जि.पुणे |
| **आरोपीत** | पीएमटी बस वरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०६/२०२४ रोजी सकाळी १०/४५ वा.चे.सुमारस कात्रज कोढवा रोडवर,कात्रज पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी पीएमटी बस बंद पडल्याने सदर बस दुरुस्ती करण्या करीता फिर्यादी यांचा मुलगा गणेश गुजर गेला होता तेव्हा सदर बस चालु होत नसल्याने दुसरी बस टोईंग करीता बोलवुन बंद पडलेल्या बसला टोईंग करीत असताना बंद पडलेल्या बसला टोचन करुन घेवुन जाणा-या बस वरील चालक याने त्याचे ताब्यातील बस वेगाने, हयगयीने व वाहतूक नियंमांकडे दुर्लक्ष करून चालवून बस चा ताबा सुटल्याने बंद पडलेली बस व टोचन करुन जाणारी बस अशा दोन्ही बसच्या मध्ये फिर्यादी यांचा मुलगा गणेश शिवाजी गुजर वय ४० वर्षे रा.कोथरुड पुणे हा सापडुन गंभीर जखमी होऊन त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.मोहन देशमुख मो.नं.९७६५३९०९४३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १३१/२०२४,भादविक ३९२,४२७,३४ क्रि.लॉ.अमेंडमेंट कायदा कलम ७ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २९ वर्षे, रा.मंगळवार पेठ पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०६/२०२४ रोजी रात्री ०१/३० ते ०१/४५ वा.चे दरम्यान सदाआनंद नगर बिल्डींग |

| | |
|---|---|
| | मंगळवार पेठ पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी बसलेले असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना कानाखाली चापट मारुन पॅन्टच्या खिशातील रोख ७५०/- रुपये जबरदस्तीने काढुन घेवुन फिर्यादी यांची रिक्षा व इतर दोन रिक्षा व दोन दुचाकींचे त्यांचे जवळील लोखंडी हत्याराने तोडफोड करुन नुकसान केले तसेच हातातील लोखंडी हत्यार हवेत फिरवुन सदर ठिकाणी दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सौरभ माने,मो.नं.९९७०६११५३० |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३४५/२०२४,भादविक २७९,३०४(अ),३३७,३३८,४२७ मो.वा.का.कलम १८४, ११९/१७७, |
| **फिर्यादी** | निलेश आढाव, वय ४८ वर्षे, रा.पिंपळे गुरव पुणे मूळ सातारा |
| **आरोपीत** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०६/२०२४ रोजी पहाटे ५/३० वा सुमारास धायरी फाटा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील अज्ञात वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचा मावस भाऊ नामे सतीश रामचंद्र इंजे, वय ३९ वर्षे, रा. यशसमृध्दी अपार्टमेंट नऱ्हे पुणे हा मॉर्निंग वॉक साठी गेल्यानंतर धायरी फाटा ब्रिजखालुन रोड क्रॉस करुन नांदेड सिटीकडे जात असताना त्यास जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.श्रीकांत सांवत,मो.नं.९५५२५५६४२४ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ५७२/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३३ वर्षे,रा.वाघोली पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०७/०३/२०२४ ते दिनांक ११/०३/२०२४ रोजीचे दरम्यान राहत्या घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना वर नमुद अनोळखी इसमांनी मोबाईल वरुन संपर्क करुन त्यांनी फिर्यादी यांना टास्क करण्याचे मोबदल्यात मोठ्या प्रमाणात नफा देतो असे अमिष दाखवून फिर्यादी यांचे कडून नमुद बॅक खात्यावर १८,११,७१६/- रु रक्कम भरणा करण्यास सांगून फिर्यादी यांची फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.सावळाराम साळगावकर मो.नं.९८२१५३७३१४ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ९९/२०२४,भादविक ३०४,२७९,३३८,४२७,३४ सह मोटर वाहन कायदा कलम १८४,११७/११९ |
| **फिर्यादी** | प्रियंका सोलंकी, वय ३८ वर्षे, रा.गंगाधाम कोंढवा रोड,पुणे |
| **आरोपीत** | १)अशोक छोटेलाल महंतो,वय ३७ वर्षे, रा.बांदल वेल्डींग वर्कस,शेजारी,बांदल इस्टेट,बावधन बुद्रुक,पुणे २) गणेश प्रकाश बांदल, वय ३६ वर्षे,रा.शिवसेना ऑफिस शेजारी,बांदल आळी, बावधन बुद्रुक,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०६/२०२४ रोजी दुपारी १२/४५ वा.चे सुमारास आईमाता ते गंगाधाम चौकाकडे जात असताना अग्निशामक दलाचे ऑफिसच्या थोडे पुढे रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील अवजड डंपर हा भरधाव वेगाने चालवत असताना सदरचे वाहन हे पुर्ण क्षमतेने भरलेले असताना आपण गर्दी व रहदारीचे ठिकाणी असे पुर्ण क्षमतेने भरलेले वाहनावर नियंत्रण ठेवु शकत नाही हे माहिती असतानाही व डंपरच्या मालकाने आपल्या मालकीचा डंपर हा पुर्ण क्षमतेने गर्दी व रहदारीच्या ठिकाणी चालकास चालवु दिल्याने असे अवजड वाहन एखादया व्यक्तीच्या मृत्युस कारणीभुत होवु शकते याची पुरेपुर जाणीव असताना सुध्दा चालकास ते चालवु दिले व असे वाहन चालकाने चालवुन फिर्यादी यांच्या टुव्हिलर वाहनास पाठीमागुन जोरात धडक देवुन टु व्हिलरचे नुकसान करुन फिर्यादी यांना गंभीर जखमी करुन फिर्यादी यांची सासु नामे दमयंती भुपेंद्र सोलंकी,वय ५९ वर्षे,रा.कुमार पृथ्वी सोसायटी,गंगाधाम कोंढवा रोड,पुणे यांना गंभीर जखमी करुन त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) राहुलकुमार खिलारे,मो.नं.९८२१७८४४७७ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ५७१/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय २६ वर्षे, रा.वाघोली पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १७/०३/२०२४ ते दिनांक १९/०३/२०२४ रोजी चे दरम्यान बी.५०५, ड्रिम्स लिनीया सोसायटी केसनंद रोड वाघोली पुणे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक अनोळखी व्यक्तीने ऑनलाईन वेगवेगळे टास्क पुर्ण करण्यास सांगुन पैसे कमवण्यासाठीचे आमिष देवुन वरील नमुद बँक खाते धारकांनी त्यांचे बँक खात्यावर पैसे स्विकारुन एकुण ७,५६०००/- रूपये ची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.सावळाराम साळगावकर मो.नं.९८२१५३७३१४ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकाळभोर पो स्टे ३१९/२०२४,भादविक २७९,३३८,३०४(अ) मो.वाहन कायदा कलम १८४, ११९/१७७,१२२/१७७ |
| **फिर्यादी** | रोहीत शेंडगे वय २४ वर्ष रा.फुरसुंगी पुणे |
| **आरोपीत** | ट्रक वरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०६/२०२४ रोजी रात्रौ ००/०५ वा.चे.सुमारास सासवड हडपसर रोडवर ग्रिटीग हॉटेल समोर वडकी ता.हवेली जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा सार्वजनिक रोडवर पार्क करून त्याने वाहनाचे पाठीमागील बाजुस कोणताही रिप्लेक्टर न लावता अथवा इतर वाहन चालकांना त्याचे वाहन बंद अवस्थेत असले बाबत कोणतेही ड्रार्यव्हर्शन न करता त्याचे वाहन सार्वजनिक रोड वरती पार्क केल्याने यातील मयत इसम ऋतेश सतिश शेंडगे वय २१ वर्ष रा.फुरसुंगी ता.हवेली जि.पुणे हा त्याचे ताब्यातील दुचाकी ही सदर ट्रकला धडकुन गंभीर जखमी घेवुन त्यांचे मृत्यु होण्यास कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.विष्णु देशमुख,मो.नं.९४२०२५३१४० |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ५७५/२०२४,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोवाका.क.१८४,१३४(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | संदेश राजेंद्रसिंग सेंगर,पोलीस अमंलदार नेमणुक-लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपीत** | अज्ञात मोटार सायकलस्वार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/०६/२०२४ रोजी सकाळी ०९/०० वा.चे.सुमारास,नगर पुणे हायवे नाईकवडे डेअरी जवळ लोणीकंद ता.हवेली जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी इसम नामे रघुनाथ रंगनाथ इंगळे, वय ६५ वर्षे रा.तितिक्षा पार्क,नाईकवडे डेअरी जवळ लोणीकंद ता.हवेली जि.पुणे यांना डाव्या बाजुने जोरात धडक देवुन गंभीर दुखापत करून त्यांचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.हवा.शिवले मो.नं.८८८८२०१००० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**